कासारवडवली पोलीस स्टेशन येथील गु.र.क्र.२५१/२०१५ (बांधकाम व्यावसायीक सुरज परमार हत्त्या प्रकरण) चे प्रकरणी मा . मा.सत्र न्यायालय व मा.उच्च न्यायालय येथील न्यायालयातील प्रकरणामध्ये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ॲड. राजा ठाकरे व ॲड.श्री.अवधुत चिमलकर यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र. एसपीपी ०३१६/प्र.क्र.६३/पोल-१०
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय ,मुंबई-४०० ००५,
दिनांक : २७.११.२०१७

संदर्भ : विधी व न्याय विभाग अधिसुचना क्र. एसपीपी २०१६/युओआर ३२/डी-१४ दिनांक २७ सप्टेंबर, २०१७

शासन निर्णय :-

कासारवडवली पोलीस स्टेशन येथील गु.र.क्र.२५१/२०१५ (बांधकाम व्यावसायीक सुरज परमार हत्त्या प्रकरण) मधून उद्भवणा-या मा.सत्र न्यायालय व मा.उच्च न्यायालय येथील प्रकरणामध्ये शासनाच्या वतीने कामकाज पहाण्यासाठी ॲड.श्री.राजा ठाकरे व श्री.अवधूत चिमलकर यांची विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून विधी व न्याय विभागाने वरील संदर्भाधीन दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ च्या अधिसुचनेन्वये नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबत ॲड. श्री राजा ठाकरे.यांना खालीलप्रमाणे व्यवसायीक फी अदा करण्यास शासन मान्यता देत आहे. या व्यतीरिक्त त्यांना अन्य कोणतीही फी वा भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

१) प्रतिदिन परिणामकारक सुनावणी फी

अ) श्री.राजा ठाकरे - रु.३५,०००/-

ब) श्री.ए.एम.चिमलकर - रु.२०,०००/-

२) विचारविनिमय फी - रु.१०,०००/- प्रति तास

२. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिका-याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

३. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस - (००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशीर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

४ . हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२८१/१७/व्यय-७, दिनांक ०१.११.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७११२७१५१२२११०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2017.11.27 16:20:49 +05'30'

(कि.शा.भालेराव)

उप सचिव(विधि), गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. पोलीस आयुक्त,ठाणे
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १ , मुंबई .
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. ॲड.श्री. राजा ठाकरे, ३०१ मारुती मॅन्शन, १७ रघुनाथ दादाजी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४००००१.
७. कार्यासन-१४, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती (पोल-१०).